भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

सुलभ ओवीबद्ध रचना

अध्याय चौदावा



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय चौदावा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नमः ॥

अध्याय चौदावा

गुणत्रयविभागयोग

गुरुदेवांचा जयजयकार करून । करतो त्यांचे गुणगान । प्रज्ञा सूर्याचं प्रकटन । तयांच्यामुळे ॥१॥
सर्वांच्या विसाव्याचे स्थान । तुम्हाकारणेच आत्मज्ञान । सृष्टीचे ते प्रकटन । तुम्हाठायी ॥२॥
बांधव तुम्ही दु:खितांचे । सागर अखंड कृपेचे । अधिष्ठान आत्मविद्येचे । गुरुदेवा तुम्ही ॥३॥
अज्ञानी ते जन । प्राप्त करती आत्मज्ञान । ब्रह्ममयतेचं प्रकटन । तुम्हाकारणे ॥४॥
दुज्याला भुली पाडणं । तया नजरबंदी म्हणणं । पण स्वत:च भुलून विश्व होणं । कौशल्य तुमचे ॥५॥
देवा तूच सर्व होतो । कोणा बोध तो देतो । कोणा जन्ममरणात अडकवतो । माया तुझी ॥६॥
पाण्यासी ते गोडपण । देवा तुझ्याचपासून । पृथ्वी क्षमाशील असणं । तुझीच कृपा ॥७॥
सूर्यचंद्राचं तळपणं । ते तुझ्याच कारण । तयांचं ते तेजस्वीपण । कृपा तुझी ॥८॥
वायूचे ते चंचलपण । देवा तुझ्याच कारण । आकाशाचंही प्रकटन । तुझ्याच ठायी ॥९॥
तुझ्याकारणे मायेचं प्रकटन । देवा तूचि ते ज्ञान । वेदही जाती थकून । वर्णिता तुजला ॥१०॥
जोवरी न होते आत्मज्ञान । तोवरीच चालते वर्णन । मग पडे मुकेच ते होणं । पडता गाठ ॥११॥
जलप्रलय तो होता । न लागे मोठ्या नदीचाही पत्ता । मग थेंबाचा तो राबता । राही कैसे ॥१२॥
सूर्य असे जेधवा उगवत । चंद्र काजवाच असे भासत । तैसी सर्व शास्त्रांची गत । ज्ञान होता ॥१३॥
जेथे द्वैतच नसे उरत । नि वैखरी परेत असे बुडत । ते अद्वैत का कधी येतं । शब्दामाजी ॥१४॥
या कारणे आता । स्तुती सोडूनी सर्वथा । चरणी ठेवणे माथा । हेचि भले ॥१५॥
असो तू कसाही । पण मजसी ज्ञान देई । भवचक्रातून बा नेई । तारून मजला ॥१६॥
आता कृपा ती करून । प्रकटू दे अंतरात ज्ञान । तेव्हाच माझे कल्याण । होईल देवा ॥१७॥
होता मजसी ज्ञान । करीन संतांचे वर्णन । ब्रह्ममयता ती पसरवीन । जगतामाजी ॥१८॥
रहस्य गीतेचे सांगावे उघडून । म्हणत आहे माझे मन । घाल तवकृपेचे अंजन । डोळ्यांत माझ्या ॥१९॥
होता अंतरी ज्ञान । सांगेल सर्वांना समजावून । मग ब्रह्ममयता पसरेन । जगतामाजी ॥२०॥
माझी प्रज्ञा वेल फुलेल । ज्ञान फळे मग लागतील । ब्रह्ममय मग होईल । जग सारे ॥२१॥
कृपावर्षाव ऐसा करावा । प्रज्ञेचा पूर तो प्रकटावा । आणि सर्व जगाने ब्रह्मभावा । व्हावे प्राप्त ॥२२॥
तूच विश्वाचा प्राण । तुझ्यामुळेच प्रकटते ज्ञान । जैसे पौर्णिमेचे प्रकटन । चंद्राकारणे ॥२३॥
होता ते बा ज्ञान । प्रज्ञेस येईल उधाण । मग नवरसांचं वाहणं । आपोआप ॥२४॥
म्हणाले श्रीगुरू ते ऐकून । विनंतीच्या त्यानिमित्तानं । स्तुती माझी करणं । आरंभले तू ॥२५॥
स्तुती आता थांबवून । सांग ग्रंथ समजावून । उत्सुकता इतकी ताणणं । बरे नाही ॥२६॥
होय श्रीगुरू स्वामी । हीच वाट पहात होतो मी । जी आज्ञा दिली तुम्ही । ती शिरसावंद्य ॥२७॥
जैसे स्वभावत: अंकुर । असतोच तो अमर । आणि तया अजून यावा पूर । अमृताचा ॥२८॥
आता तुमच्याच कृपेनं । सांगेन ग्रंथ विस्तारून । ग्रंथातील मूळ ज्ञान । प्रकटेल येथे ॥२९॥
सत्य ज्ञानाच्या वर्षावाकारणं । जातसे संदेह तो संपून । मगच होते ते श्रवण । अंतरामाजी ॥३०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तैशा शब्दांचं प्रकटन । होवो माझ्या मुखातून । तेच गुरूकृपेचे लक्षण । आहे देवा ॥३१॥
क्षेत्रक्षेत्रज्ञाचं वर्णन । तेराव्यात केलं भगवंतानं । तयाचे ते निरूपण । ऐकले तुम्ही ॥३२॥
क्षेत्रक्षेत्रज्ञ संयोगानं । होतसे जग निर्माण । आत्मतत्त्व होते गुणांच्याकारणं । संसारी येथे ॥३३॥
सापडून प्रकृतीच्या तावडीत । तत्त्व सुखदु:ख असे भोगत । स्वये असूनही गुणातीत । कैवल्य ते ॥३४॥
कैसा घडे असंगा संग । काय तो क्षेत्रक्षेत्रज्ञ योग । कैसे ते सुखदु:खादि भोग । येती तया ॥३५॥
गुण ते कैसे किती । बांधती कवणे रीती । चिन्हे ती काय असती । गुणातीताची ॥३६॥
खुलासा या बाबींचा । विषय आहे चौदाव्याचा । विचार गुणगुणातीताचा । ऐकाल तुम्ही ॥३७॥
या सर्व बाबतीत । भगवंत काय म्हणतात । मनासी एकाग्र करत । ऐकावे तुम्ही ॥३८॥
सर्वांगाचे करून कान । जेव्हा प्रकटते अवधान । तेव्हाच अंतरी ज्ञान । प्रकटते अर्जुना ॥३९॥
करून अनेक युक्तिवाद । मागे अनेकदा केले विशद । पण तुला काही बोध । झाला नाही ॥४०॥

श्री भगवानुवाच

म्हणून गा पुढती । सांगेल बा तुजप्रती । जया वेद पर म्हणती । असे ते काय ॥४१॥
खरे तर हे ज्ञान । आहो स्वत:च आपण । पण मनइंद्रियांच्या नादी लागून । परके झाले ॥४२॥
अगा याचि कारणे । हे सर्वोत्तम मी म्हणे । इतर भौतिक ज्ञाने । अज्ञानच की ॥४३॥
भव स्वर्ग खरे मानणे । कर्मकांड ते करणे । द्वैत खरे वाटणे । अज्ञान अर्जुना ॥४४॥
ते सर्व भ्रम अज्ञान । नष्ट होते या ज्ञानानं । जसं आकाशात ते विरणं । वादळाचं अर्जुना ॥४५॥
जसा सूर्य तो उगवणे । मग चंद्र लोप पावणे । जलप्रलयी नद्या गडप होणे । तैसे अर्जुना ॥४६॥
हे ज्ञान येता उदया । इतर ज्ञाने जाती लया ।म्हणून बा ज्ञानास या । म्हणावे उत्तम ॥४७॥
अनादि जी मुक्तता । आपुली असे पांडुसुता । मुक्तीस त्या अनुभवता । घडे मोक्ष ॥४८॥
येता या ज्ञानाची प्रचीती । सर्व भोग विचार संपती । मी-पणाची ती स्मृती । मावळते अर्जुना ॥४९॥
मनाने मनास संपवणं । मनइंद्रियापार जाणं । मग तो देहाच्या अधीन । राहीचना ॥५०॥
ऐसे मनइंद्रियापार जाणे । स्वप्न सुषुप्ति ओलांडणे । मग मीच होऊन राहणे । जगती अर्जुना ॥५१॥
मजसी एकरूप होता । अंतरी परिपूर्णता जाणता । मीच होऊन राहता । व्यथा कैची ॥५२॥
मी बा शाश्वत आनंद । सदैव नित्य सिद्ध । तेथे आमच्यात तो भेद । उरेचिना ॥५३॥
मजसी येऊन मिळणे । नि मीच होऊन राहणे । जसे घटाकाशाने आकाश होणे । भंगता घट ॥५४॥
जसे त्या ठिणगीने । पुन्हा अग्नीसी एक होणे । तैसे मजसी येऊन मिळणे । ज्ञान अर्जुना ॥५५॥
ऐसे मजसी एकरूप होऊन । मीच होऊन जाणं । तेच द्वैताचं संपणं । असे अर्जुना ॥५६॥
द्वैताचेच कारणे । घडे सृष्टीचे प्रकटणे । द्वैत ते संपणे । मुक्ती अर्जुना ॥५७॥
सृष्टीच्या आरंभात । जे देहबद्ध नाही होत । अर्जुना ते प्रलयात । मरेल कैसे ॥५८॥
या ज्ञानासी प्राप्त होणं । तेच जन्ममरण ओलांडणं । मीच होऊन जाणं । ज्ञान अर्जुना ॥५९॥
ऐसे अप्रतिम ज्ञान । सांगितलं त्या भगवंतानं । मग अर्जुन तो तल्लीन । झाला तेथे ॥६०॥
अवस्था झाली विलक्षण । रोमरोमी प्रकटले कान । अनंत ते अवधान । लाभले तया ॥६१॥
ऐसे प्रकटून अवधान । ऐकत होता अर्जुन । मग आकाशी ते निरूपण । मावेचि ना ॥६२॥
मग म्हणे भगवान । धन्य माझे व्याख्यान । श्रोता तुजसारखा लाभून । तोषलो मी ॥६३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

असून मी एकलाचि एक । कैसा होऊन जातो अनेक । फासा तो त्रिगुणाचा ऐक । अर्जुना तू ॥६४॥
क्षेत्राच्या त्या संयोगानं । कैसे होते जग निर्माण । तयाचे ते वर्णन । ऐकावे आता ॥६५॥
मज संगतीकारणे । येथे पंचभुतांचे प्रकटणे । म्हणून क्षेत्र या नावाने । प्रसिद्ध अर्जुना ॥६६॥
या प्रकृती मायेस । महद्ब्रह्म नाव खास । जे सर्व या सृष्टीस । कारण अर्जुना ॥६७॥
आकार आणि गुण । होती हिच्यामुळेच निर्माण । म्हणून महद्ब्रह्म म्हणणं । पडे तिजला ॥६८॥
त्या अव्यक्त वादात । हिलाच अव्यक्त म्हणतात । आणि त्या सांख्यमतात । प्रकृती ही ॥६९॥
हिलाच त्या वेदांतानं । माया असं म्हणणं । प्रकृती माया अज्ञान । भिन्न नाही ॥७०॥
स्वत:लाच आपण विसरणं । तेच अर्जुना अज्ञान । स्वत:चेच विस्मरण । दु:खदायी ॥७१॥
विचार असता मनात । आत्मज्ञान नाही प्रकटत । जसा अंधार नसे दिसत । लावता दिवा ॥७२॥
दूध ते ढवळता । न दिसे सायीचा पत्ता । पण दूध संथ होता । प्रकटते साय ॥७३॥
ना जागृती ना स्वप्न । नसे स्वरूपाचे भान । ती सुषुप्ति बा असणं । ढगा जैसी ॥७४॥
होण्यापूर्वी वायू निर्माण । जसं आकाश रितं असणं । तैसेच बा अज्ञान । आहे अर्जुना ॥७५॥
जेधवा खांब का माणूस । नाही दिसत डोळ्यास । पण काही तरी भास । होतो जैसा ॥७६॥
ती वस्तू जैसी असे । ती तैसीच न दिसे । आणि काय हे जे भासे । कळेचि ना ॥७७॥
घड अंधार तो नसणे । नि प्रकाशही न दिसणे । ते सांजवेळेचे असणे । तैसे अर्जुना ॥७८॥
ऐशा त्या दशेस । अज्ञान नाव खास । अज्ञानी गुरफटलेल्या आत्मतत्त्वास । क्षेत्रज्ञ म्हणती ॥७९॥
अज्ञान ते वाढणे । आत्मस्वरूपास विसरणे । हीच क्षेत्रज्ञाची लक्षणे । आहेत अर्जुना ॥८०॥
क्षेत्रज्ञाचे क्षेत्र बनणे । तयासीच बा द्वैत म्हणणे । सर्व हे नैसर्गिकपणे । घडते अर्जुना ॥८१॥
आता द्वैताच्या कारणं । वस्तूने अनेकत्व धारण करून । स्वत: भ्रमित होणं । अज्ञान अर्जुना ॥८२॥
जैसे राजाने भ्रमून । मी भिकारी म्हणणं । मूर्च्छितानं स्वर्गा जाऊन येणं । तैसे अर्जुना ॥८३॥
ऐसे होता स्वरूपाचे विस्मरण । घडे मनोभ्रमांचं प्रकटन । तेच बा सृष्टीचे निर्माण । माझे ठायी ॥८४॥
जसे त्या स्वप्नात । आपणच बहुभूमिका असतो अनुभवत । तैसे द्वैत भास प्रकटतात । अज्ञाना कारणे ॥८५॥
आता वेगळ्या पद्धतीनं । सांगतो मी स्पष्ट करून । परि हे सर्व स्वप्ना समान । मिथ्याच की ॥८६॥
तरी माझी ही गृहिणी । जी अनादि तरुणी । भ्रमाची ती खाणी । अविद्या होय ॥८७॥
एक नसे हिचे रूप । तिचा अमाप आहे व्याप । राहणे अज्ञाना समीप । स्वभाव तिचा ॥८८॥
जेव्हा मजसी निद्रा येते । तेव्हा ही जागते । आणि सृष्टी निर्माण होते । तिच्यापोटी ॥८९॥
महद्ब्रह्माच्या उदरात । विकार आठ उठतात । मग गुण आकार प्रकटतात । ब्रह्माठायी ॥९०॥
उभयसंगू पहिले । बुद्धितत्त्व प्रकटले । मग बुद्धिठायी जन्मले । मन अर्जुना ॥९१॥
मनाच्या त्या कारणे । अहंकाराचे भासणे । मग पंचभुतांचे प्रकटणे । घडे तेथे ॥९२॥
त्या पंचभुतांच्या कारणे । पंचेंद्रिये ती प्रकटणे । आणि पंचविषयांचे असणे । सोबत त्यांच्या ॥९३॥
ऐसे विकारांच्या कारण । प्रकटतात ते त्रिगुण । मग वासनेचं जन्मणं । अनिवार्य तेथे ॥९४॥
जसे त्या बीजातून । होई वृक्षाचं प्रकटन । बीज पाण्याच्या भेटीतून । प्रकटे वृक्ष ॥९५॥
तैसे माझ्यासंगाबरोबर । प्रकृती निर्मिते संसार । आणि नाना गर्भाचे प्रकार । अंकुरीत होती ॥९६॥
पुढे कैसे गर्भगोळ्यात । रूप गुण प्रकटतात । ते सर्व साद्यंत । ऐकशील आता ॥९७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पहा अंडज व स्वेदज । उद्‌भिज आणि जारज । उत्पन्न होती सहज । जीव तेथे ॥९८॥
आकाश वायू संयोगानं । अंडज ते उपन्न होणं । अंड्यातून होई निर्माण । जीव तेथे ॥९९॥
तम रजाने युक्त होऊन । होता तेजाची उसळण । स्वेदजांचे ते निर्माण । घडे तेथे ॥१००॥
जलपृथ्वीच्या कारण । तमाची होता उधळण । मग उद्‌भिजांचे ते निर्माण । तयाठायी ॥१०१॥
पंचभुतांच्या प्राबल्यते कारण । पंच ज्ञानेंद्रियाची निर्माण । प्रसिद्ध तेच जारज म्हणून । असती अर्जुना ॥१०२॥
ऐसे चारही हे सरळ । असती कर चरण तळ । अष्टधा प्रकृती स्थूल । शिर तिचे ॥१०३॥
प्रवृत्ती तिचे पोट । आणि निवृत्ती ती पाठ । प्रकृतीची अंगे आठ । असती अर्जुना ॥१०४॥
कंठ तो स्वर्ग । मृत्युलोक मध्यभाग । पाताळ खालचा भाग । आहे अर्जुना ॥१०५॥
ऐसे लेकरू एक । प्रसवली प्रकृति देख । आणि तिन्ही ते लोक । लागती नांदू ॥१०६॥
चौऱ्यांशी लक्ष योनी । हीच हाडापेरांची सांधणी । ऐसे वाढे प्रतिदिनी । बालक येथे ॥१०७॥
नाना देह बनून । नामरुपाचं प्रकटन । मग नित्य नवे अज्ञान । लागे फुलू ॥१०८॥
पहा सृष्टी वेगवेगळी । नामरुपाने निराळी । ऐसी अज्ञानाची झळाळी । प्रकटली येथे ॥१०९॥
ऐसे सर्व चराचर । प्रसवून बालक सुंदर । अज्ञानरूपी आकार । नांदती येथे ॥११०॥
ब्रह्मा तो प्रात:काल । विष्णु मध्यान्हवेळ । सदाशिव सायंकाळ । आहे येथे ॥१११॥
महाप्रलय समयात । विश्व लया असे जात । पुन्हा विपरीत त्या ज्ञानात । प्रकटते सृष्टी ॥११२॥
अर्जुना ऐसे इयापरी । मिथ्या दृष्टीच्या घरी । अज्ञानवृत्ती करी । निर्मिती येथे ॥११३॥
संकल्प अज्ञानाकारण । अहंकाराचं प्रकटन । केवळ सत्यज्ञानानं । अंत याचा ॥११४॥
खूप बोललो मी बोली । ऐसे विश्वमाया व्याली । तेथ साह्य झाली । माझी सत्ता ॥११५॥
याकारणे मी पिता । महद्‌ब्रह्म हे माता । अपत्य पांडुसुता । विश्व सारे ॥११६॥
नाना आकार पाहून । नकोस जाऊ तू भ्रमून । सर्व विश्व ते असणं । एकचि येथे ॥११७॥
जसे एकाच त्या देहात । अवयव निरनिराळे असतात । तसे एकचि तत्त्व या विश्वात । नांदते अर्जुना ॥११८॥
जसे एकाच त्या बीजातून । लहान मोठ्या फांद्यांचे निर्माण । तसे सर्व विश्वाचे निर्माण । तत्त्वाठायी ॥११९॥
आणि संबंध तो ऐसा । मृत्तिका घटा जैसा । वा संबंध कापडाचा कापसा । तैसा अर्जुना ॥१२०॥
लाटा आणि सागर । तैसे आम्ही आणि चराचर । या प्रकृतीचा व्यवहार । आमच्याठायी ॥१२१॥
मशाल आणि ज्योत । जसे अग्नीच असतात । तसा मीच चराचरांत । नांदतो अर्जुना ॥१२२॥
उत्पन्न होता जगत । नसेच मी कधी लोपत । माणिक का कधी तेजात । विरघळतो अर्जुना ॥१२३॥
करता अलंकाराचे रूप धारण । लोपते का सोन्याचे सोनेपण । का नष्ट होते कमळपण । उमलता कळी ॥१२४॥
देही आणि देह । भिन्न असती काय । देही तोच देह । जाण तू अर्जुना ॥१२५॥
जोंधळा वाढता जोरानं । मोठं कणीस ते पडणं । मग अधिक धान्य पिकणं । तैसे अर्जुना ॥१२६॥
मी आणि जगत । भिन्न नाहीच बा असतं । मीच असे नांदत । होऊनी विश्व ॥१२७॥
या सत्यज्ञाना । प्राप्त हो तू अर्जुना । जीवभावाच्या बंधना । झुगारून दे ॥१२८॥
मीच सर्व आकारात । अर्जुना असे राहत । जे त्रिगुणाकारणे घडतं । अर्जुना येथे ॥१२९॥
जसे स्वप्नी ते मरून । आपणच आपले मरण भोगणं । आणि दु:ख ते मानणं । तैसे अर्जुना ॥१३०॥
ग्रासता त्या काविळे । रोगट होती डोळे । मग जगत दिसे पिवळे । तैसे अर्जुना ॥१३१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसे ढगांच्या कारण । सूर्य तो न दिसणं । तैसेच कार्यकारण । घडे येथे ॥१३२॥
आपल्याच कारण । सावलीचं ते प्रकटन । त्या सावलीस बा घाबरणं । अज्ञान की ॥१३३॥
उपजता ते अज्ञान । प्रकटती नाना गुण । गुणाकारणेच बंधन । दृढ होते ॥१३४॥
वाढता ते गुण । वाढते ते अज्ञान । ऐसे माझे मला विस्मरण । होते अर्जुना ॥१३५॥
कोणत्या त्या गुणांकारण । माझं ते बद्ध होणं । ऐक कान देऊन । अर्जुना आता ॥१३६॥
हे गुण किती असती । काय तयांचे स्वभाव रीती । तयांची लक्षणे कोणती । ऐक आता ॥१३७॥
सत्त्व रज तम । तिघांचे हे नाम । तयांचा तो जन्म । प्रकृतीठायी ॥१३८॥
येथे सत्त्व ते उत्तम । रज ते मध्यम । तमासी अधम । म्हणती अर्जुना ॥१३९॥
बालपण तारुण्य वृद्धपण । एकाच देही आढळणं । तैसे हे तिन्ही गुण । आढळती मनी ॥१४०॥
जसे धातू इतर मिसळता । वाढते सोन्याची हीनता । मग सोनेपणाची सिद्धता । होतसे कमी ॥१४१॥
अवधानाचे कमी होणे । तेच आळसाचे वाढणे । सुषुप्तीचे मग बळकटणे । आपोआप ॥१४२॥
तैसे अज्ञानाकारणे । वृत्तींचे ते वाढणे । मग सत्त्व रज तम प्रकटणे । घडे येथे ॥१४३॥
अर्जुना गा जाण । यांचेच नाम गुण । आता पाहू ते बंधन । घालती कैसे ॥१४४॥
येता त्या क्षेत्र दशेत । मीच देह असं वाटतं । तीच अज्ञानाची सुरवात । असे अर्जुना ॥१४५॥
मग अखंड जन्म मरण । देहात त्या अडकून । देहाभिमान धरून । जगतसे तो ॥१४६॥
मग माशाने आमिष गिळणं । तोच कोळ्याने झटका देणं । तैसा तो सत्त्वगुण । उत्पन्न होतो ॥१४७॥
मग जैसे ते हरिण । जाते जाळ्यात जखडून । तैसे सुख आणि आणि ज्ञान । बांधते जिवा ॥१४८॥
मग ज्ञानासाठी चरफडतो । लाथा अहंकाराच्या झाडतो । ऐसा सुख तो धाडतो । दूर अर्जुना ॥१४९॥
सन्मान होता प्राप्त । होत असे तो आनंदित । स्वत:ला सुखी समजत । भ्रमे तो ॥१५०॥
माझ्यासारखा कोण । आहे दुजा भाग्यवान । अशा अष्टसात्त्विक भावानं । फुगतसे तो ॥१५१॥
हे इतक्यावरच नाही थांबत । तया लांछन असे लागत । जेधवा विद्वतेचे भूत । संचरे अंगी ॥१५२॥
गेले आपले मूळ स्वरूप ते । याचे दु:ख न वाटते । छाती विषयज्ञाने फुगते । आकाशा एवढी ॥१५३॥
राजा जसा स्वप्नात । भीक असे मागत । आणि दिडकी होता प्राप्त । म्हणे इंद्र मी ॥१५४॥
ऐसे त्या देहातीताने । स्वत:स देहवंत मानणे । मग भ्रमिष्टपणे वागणे । घडे तेथे ॥१५५॥
कुशल होतो व्यवहारात । कर्मकांड तया आवडतात । तया स्वर्गही असे वाटत । ठेंगणा अर्जुना ॥१५६॥
मजवाचोनि कोणी । नाहीच दुसरा ज्ञानी । चंद्र जैसा गगनी । एकटाच की ॥१५७॥
ऐसा सात्त्विक तो ज्ञानी । जाई स्वरूपास विसरूनी । पहा नंदीबैलावानी । अवस्था त्याची ॥१५८॥
आता हाच शरीरधारी तो । रजोगुणे कैसा बांधला जातो । सविस्तर ते सांगतो । ऐक पुढे ॥१५९॥
यासी पडे रज ते म्हणणे । याने जिवाचे रंजन करणे । इच्छा वासना कारणे । धडपडे जो ॥१६०॥
रजोगुण जिवात शिरतो । मग जीव वासनामय होतो । आणि घोड्यावर आरुढतो । वासनेच्या ॥१६१॥
तूप टाकता अग्नीत । निखारे तळपती धगधगीत । जसे होमकुंड असे पेटत । तैसे अर्जुना ॥१६२॥
विषयांची आवड असे वाढत । मग दु:खही गोड वाटतं । स्वर्गही होता प्राप्त । वाटे अपुरा ॥१६३॥
तृष्णा अशी भडकते । मेरू पर्वताही जिंकते । तरी समाधान जिवा ते । वाटेच ना ॥१६४॥
जिवाची पर्वा न करत । कवडीसाठी असे धडपडत । होता कवडी ती प्राप्त । सार्थक माने ॥१६५॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मेलो तरी चालेल । पण धंदा मोठा वाढवेल । आणि श्रीमंत मी होईल । वासना त्याची ॥१६६॥
पुढे स्वर्गाच्या आशेने । दानधर्म करणे । यज्ञी कर्मकांड आचरणे । आवडे तया ॥१६७॥
पहा व्रतापाठी व्रत । असे सदैव तो करत । पण इच्छांच्याच त्या जाळ्यात । अडकला असे ॥१६८॥
ग्रीष्मांतीचा तो वारा । विसावा न जाणे जरा । तसा गुंते हा व्यापारा । रात्रंदिवस ॥१६९॥
तयाचे ते चंचलपण । अधिकच कामिनीकटाक्षाहून । अधिकच ती विजेहून । लगबग त्याची ॥१७०॥
ऐसा विलक्षण वेगाने । स्वर्ग संसाराच्या लालचीने । कर्माच्या आगीत जळणे । तयाने अर्जुना ॥१७१॥
असून वेगळा देहाहून । तयाचं वासनेत अडकणं । मग जाई तो मरून । वासनेपायी ॥१७२॥
ऐसे अर्जुना दारुण । रजोगुणाचे बंधन । आता तमाचे ते श्रवण । करावे तू ॥१७३॥
जयाच्या बा कारणे । जिवाने अंध होणे । मोहाचा अंधार पसरणे । तैसे अर्जुना ॥१७४॥
प्रकटता गहन अज्ञान । जीव जात असे भुलून । तैसे तमाचे प्रकटन । आहे अर्जुना ॥१७५॥
तम अविवेकाचा महामंत्र । मूर्खपणाचे जे मद्यपात्र । जसे ते मोहनास्त्र । तैसे अर्जुना ॥१७६॥
तमाच्या त्या कारणे । अज्ञान गहन होणे । मग देहास मी मानणे । घट्ट होई ॥१७७॥
वाढ होता तमाची । हार होते विवेकाची । मग मात्रा ती कोणाची । चालत नाही ॥१७८॥
इंद्रिया जडते जडपण । आणि मनासी ते मूर्खपण । मग आळसाचं प्रकटन । होई तेथे ॥१७९॥
आळस मनी येतो । कर्माचा तिटकारा करतो । आणि जांभया तो देतो । सदोदित ॥१८०॥
डोळे उघडे असूनही । तया दिसत नाही काही । कोणी न हाक मारताही । म्हणे ओ ॥१८१॥
जसा दगड एकदा पडता । हालेच ना काही करता । तैसे याने मुरकुंडी मारता । उठेचि ना ॥१८२॥
पृथ्वी पाताळी जावो । की आकाश खाली येवो । परि जागण्याचा भावो । नाही तेथे ॥१८३॥
उचित अनुचित आघवे । पेंगल्याकारणे न आठवे । जेथेच्या तेथे लोळावे । बुद्धि त्याची ॥१८४॥
हात ते उचलून । गालासी आधार देणं । गुडघ्यांची उशी करणं । ठाऊक त्याला ॥१८५॥
निद्रेचा इतका लळा । की एकदा का झोपला । मग स्वर्गलाभ झाला । वाटे तया ॥१८६॥
ब्रह्मदेवाचे आयुष्य लाभावे । नि झोपेतच ते घालवावे । ऐसेच बा वाटावे । तयाला सदा ॥१८७॥
वाटेने चालत असता । पेंग तया येता । कोणी अमृतही देऊ लागता । नच घे तो ॥१८८॥
जर कधीकाळी । आली कष्ट करण्याची पाळी । तर रागाने होतसे आंधळी । दृष्टी त्याची ॥१८९॥
कधी कैसे वागावे । कोणा काय बोलावे । हे नच समजे आघवे । तयाला कधी ॥१९०॥
जसे त्या पतंगाने । वणवा विझवणे इच्छिणे । मग पंख हलवून घालणे । हवा जैसी ॥१९१॥
दु:साहस ते करणे । तयासी बा आवडणे । करू नये ते करणे । स्वभाव त्याचा ॥१९२॥
अविचार आळस झोपेनं । तमोगुणात अडकल्यानं । स्वरूपाचे ते स्मरण । नच येई तया ॥१९३॥
लाकडा आग लागणे । मग लाकडाचा आकार घेणे । जसे घटी आकाशाने । होणे घटाकाश ॥१९४॥
जसे तळ्यातल्या पाण्यात । चंद्रबिंब असे दिसत । तैसे बद्ध गुणांच्या आभासात । तत्त्व अर्जुना ॥१९५॥
कफ-वाता कमजोर करून । शरीरात पित्तानं बळावणं । मग त्रास ते होणं । तैसे अर्जुना ॥१९६॥
उन्हाळा पावसाळा संपणे । आणि हिवाळा तो येणे । मग थंडी ती वाढणे । तैसे अर्जुना ॥१९७॥
ओलांडता स्वप्न आणि जागृती । मगच प्रकटते सुषुप्ति । जी जीवभावाची बीजवृत्ती । तैसे अर्जुना ॥१९८॥
रज तमा हरवून । सत्त्वगुण तो वाढणं । मग सुख ते वाटणं । जिवासी अर्जुना ॥१९९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

सत्त्व रज लोपणं । तमाचे राज्य ते येणं । मग प्रमादाचं घडणं । अनिवार्य तेथे ॥२००॥
याच बा रीतीनं । सत्त्व तमा मागे टाकून । रज होतसे बलवान । जेव्हा अर्जुना ॥२०१॥
तेव्हा कर्मावाचून काही । जीवा त्या सुचत नाही । विसावा तो जराही । नावडे जीवा ॥२०२॥
ऐसे तीन श्लोकातून । केले त्रिगुण कथन । आता सत्त्वादि गुणांचं वाढणं । ऐक अर्जुना ॥२०३॥
रजतमास मागे टाकून । सत्त्वाची वाढ होणं । काय तयाची ती लक्षणं । ऐकावी आता ॥२०४॥
वसंत ऋतूच्या हंगामात । सुवास न सामावे कमळात । तसे ज्ञान असे दरवळत । चौफेर अर्जुना ॥२०५॥
सहाही इंद्रियांच्या घरात । विवेकबुद्धि असे राहत । आणि सत्कर्म बा करतात । हातपाय ॥२०६॥
जसं त्या राजहंसानं । निरक्षीर न्याय जाणणं । तसं विवेकपूर्ण वागणं । याच अर्जुना ॥२०७॥
जाणून पाप आणि पुण्य । करती निर्णय ते पारखून । आणि इंद्रियांनी बा असणं । गुलाम त्यांचे ॥२०८॥
वाईट ते न ऐकती । अयोग्य ते न पहाती । आणि चुकीचे न बोलती । कधी अर्जुना ॥२०९॥
जसा त्या दिव्याच्या समोर । पळ काढतो अंधार । तैसे निषिद्ध कर्मे पसार । तयांचे ठायी ॥२१०॥
जशी नदी त्या पावसाळ्यात । तुडुंब भरून असे वहात । तसे सर्वशास्त्रजात । तयांच्या मुखी ॥२११॥
जसा पौर्णिमेच्या काळात । पसरे चंद्रप्रकाश आकाशात । तैसे ज्ञानाच्या त्या प्रांतात । वावर त्यांचा ॥२१२॥
वासना तयांच्या स्थिरावतात । आशेला ओहटी असे लागत । आणि विषयांना असे विटत । मन त्यांचे ॥२१३॥
ऐसे सत्त्वगुणाचं वाढणं । आणि सत्त्वात होता निधन । तयाचे मग कल्याण । आपोआप ॥२१४॥
साजरा करण्या सण । उत्तम पक्वान्न बनवणं । आणि यावे आवडत्या पाहुण्यानं । तैसे अर्जुना ॥२१५॥
घरात असावी संपत्ती । नि मनी उदारवृत्ती । मग लोक परलोकी कीर्ती । आपोआप ॥२१६॥
ऐसे तयाच्या गुणांना । तुलनाच नसे अर्जुना । सद्गती या सत्त्वसंपन्ना । नक्कीच की ॥२१७॥
सत्त्वगुणांना घेऊन सोबत । हा देह असे सोडत । मग आपोआप कल्याण होतं । तयाचं अर्जुना ॥२१८॥
ऐशा सत्त्वसंपन्न स्थितीत । जो सोडतो देह अकस्मात । तोच पुढे असे जन्मत । ज्ञानी म्हणून ॥२१९॥
जसे वैभव सोबत घेऊन । राजाने डोंगरी जाणं । तरी काहीच ते उणेपण । न येते तया ॥२२०॥
जसा या गावांचा दिवा । शेजारच्या गावी न्यावा । तरी दिवा या नावा । पात्र तो ॥२२१॥
तसे वाढता सत्त्वगुण । प्रकटते ज्ञान विलक्षण । मग दिसे विवेक आणि अवधान । तयाच्या ठायी ॥२२२॥
मग साधता अंतरी अवधान । घडे विचारांचं संपणं । संपूर्ण विचार जाता जिरून । प्रकटते ज्ञान ॥२२३॥
छत्तिसा सदतिसावे । चोविसा पंचविसावे । तिन्ही नुरोनि स्वभावे । चतुर्थ जे ॥२२४॥
असे जे ब्रह्म । सर्वांत जे उत्तम । तयासवे तो जन्म । होतो तयाचा ॥२२५॥
अथवा सत्व तमा हरवून । बलिष्ठ होता रजोगुण । मग कर्मांची उधळण । होते तेथे ॥२२६॥
आपल्या त्या कार्यानं । धुमाकूळ देतो उडवून । तयाची ती लक्षण । ऐक आता ॥२२७॥
जसं त्या चक्रीवादळानं । सर्वांना हवेत उडवणं । तसे इंद्रियांना मोकळे रान । विषयांमाजी ॥२२८॥
संबंध परस्त्रीशी ठेवणे । नीतीविरुद्ध न माने । मग चरे त्या शेळीप्रमाणे । चारी दिशा ॥२२९॥
ऐसा होऊन तो लोभी । स्वैरपणे भोग भोगी । आणि जे हाती न लागी । तेवढेच सुटे ॥२३०॥
नीतीनियम सोडणे । भलतेच काम करणे । आणि लोभ तो वाढवणे । प्रवृत्ती त्याची ॥२३१॥
राजवाडा तो बांधणे । वा अश्वमेध करणे । ऐशाच अचाट छंदाने । पछाडलेला ॥२३२॥
नगरे ती रचावी । नि जलाशये निर्मावी । महावने ती लावावी । इच्छा त्याची ॥२३३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसा अफाट कर्मी । अति उत्साही तो उपक्रमी । मग्न सदैव कामी । अर्जुना तो ॥२३४॥
महासागरही त्याच्या तुलनेत । अपुराच असे ठरत । सदैव अफाट कामनात । वावर त्याचा ॥२३५॥
ऐशा आशा त्या वाढणे । आणि याने पाठलाग करणे । ऐसे जन्मभर भटकणे । तयाने अर्जुना ॥२३६॥
ऐसी बा रजोगुणात । लक्षणे ती उद्‌भवतात । मग होतो याच गोंधळात । देहपात त्याचा ॥२३७॥
या रजोगुणाकारण । तया नवा देह लाभणं । मग मनुष्य योनीत जन्मणं । पडे त्यासी ॥२३८॥
मूळचा जो भिकारी । जरी बैसला राजमंदिरी । तो होतो का कधीतरी । राजा अर्जुना ॥२३९॥
जसा त्या बैलाला । कडबाच मिळतसे खायला । जरी तो श्रीमंताच्या वऱ्हाडातला । बैल अर्जुना ॥२४०॥
रजोगुणाचे कारणे । सदैव कामनाधीन असणे । मग तैशाच ठिकाणी जन्मणे । पडे त्यासी ॥२४१॥
कर्मबीजाच्या कारणे । तैसाच देह धरणे । पुन्हा कर्म करत मरणे । भाग्य त्याचे ॥२४२॥
रजसत्त्वा मागे टाकून । जेधवा वाढतो तमोगुण । तयाचं ते वर्णन । ऐकावे अर्जुना ॥२४३॥
वाढता तो तमोगुण । प्रकटतात जी लक्षणं । ते आता लक्ष देऊन । ऐकावेस तू ॥२४४॥
जसं अमावास्येच्या रात्रीनं । सूर्यचंद्रहीन असणं । तैसे विवेकावीण । मन त्याचे ॥२४५॥
विवेकशून्य त्याचे मन । जे असहनशील असणं । मनाचे ते संयमन । न ठाऊक तया ॥२४६॥
चित्त ते कठीणपणात । दगडास मागे असे टाकतं । आणि देशोधडी असे लागत । स्मरणशक्ती ॥२४७॥
अविवेकाच्या कारण । सर्वत्र उद्दामपणे वागणं । निरंतर मूर्खत्वाचे प्रकटन । तयाचे ठायी ॥२४८॥
अनीतीच्या कारण । तयाने सदैव दु:ख भोगणं । तरी वाईट ते वागणं । न सोडेच तो ॥२४९॥
जसे त्या घुबडास ते । अंधारातच बा दिसते । तसे यास कुकर्म सुचते । सदैव अर्जुना ॥२५०॥
प्रसिद्ध जे निषिद्ध म्हणून । तयाचीच याने हाव धरणं । आणि सदैव ते धावणं । कुकर्माकडे ॥२५१॥
दारू न पिता झोकांड्या खातो । बेशुद्ध न होता बरळतो । आणि कुकर्मी तो अडकतो । मूर्खापरी ॥२५२॥
चित्त नसतेच बा ठिकाणी । परि नाही ते उन्मनी । पछाडलेला तो मोहानी । सदैव अर्जुना ॥२५३॥
ऐसे सर्व ते दुर्गुण । वाढवतसे तो तमोगुण । म्हणून तयाचे आचरण । होई भ्रष्ट ॥२५४॥
आणि जर कदाचित । ऐशा स्थिती झाला देहपात । मग मोट बरोबर असे नेत । तमोगुणाची ॥२५५॥
जसे त्या राईने । मोहरीपण बीजात ठेवून मरणे । मग दुसरे काही उगवणे । घडे का कधी ॥२५६॥
जर एका अग्नीवरी । पेटविली ज्योत दुसरी । मग मूळ अग्नी विझला तरी । बिघडले कोठे ॥२५७॥
ऐसी तमाची मोट बांधून । जो बाहेर पडतो देहातून । तया तामसी शरीर लाभणं । अनिवार्य की ॥२५८॥
ऐशा त्या तमोगुणात । घडता बा देहपात । पशु-पक्षी कीटकाच्या शरीरात । जन्मतो तो ॥२५९॥
याच बा कारणे । जे निपजे सत्त्वगुणे । तयासी सुकृत ती म्हणे । श्रुती अर्जुना ॥२६०॥
म्हणून त्या सत्त्वगुणापासून । निपजते सुख आणि ज्ञान । जे कार्यकारण भावानं । बांधलं असे ॥२६१॥
त्या रजोगुणाच्या क्रिया । जशा इंद्रावणीच्या बिया । बाह्यत: सुंदर जरी काया । अंतरी कडू ॥२६२॥
फळ निंबोळेचे जसे । बाहेर गोड अंतरी कडू असे । तसे राजस क्रियांचे फासे । दु:खदायी ॥२६३॥
जशी विषारी झाडास ती । फळे विषारीच लागती । तशी तामसी क्रियांची दुर्गती । अज्ञान होय ॥२६४॥
म्हणौनि बा अर्जुना । सत्त्वचि कारण ज्ञाना । जैसे का दिनमाना । कारण सूर्य ॥२६५॥
आणि तैसेचि हे जाण । लोभासी रज कारण । जयाच्या कारणे विस्मरण । स्वरूपाचे अर्जुना ॥२६६॥
प्रमाद मोह अज्ञान । यासी तमोगुण कारण । देहभाव तो घट्ट होणं । तम अर्जुना ॥२६७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे विचारांच्या डोळा । दाविला त्रिगुणाचा सोहळा । पहाणे जसा आवळा । तळहाती अर्जुना ॥२६८॥
संपवण्या रज तमाची कहाणी । व्हावे अर्जुना सत्त्वगुणी । बा त्या सत्त्वगुणावाचुनी । न प्रकटे ज्ञान ॥२६९॥
म्हणून सत्त्वगुणी होऊन । रज तमाचा त्याग करणं । मगच चौथ्या भक्तीचे प्रकटन । शक्य अर्जुना ॥२७०॥
सात्त्विक त्या गुणात । होता अर्जुना देहपात । मग स्वर्गाचं राज्य लाभतं । आपोआप ॥२७१॥
तैसे या रजोगुणात । अर्जुना जे जे मरतात । मग जन्मती मनुष्य योनीत । मृत्युलोकी ॥२७२॥
त्या मनुष्यजन्मात । सुखदु:ख अनुभवा येतं । आणि अंती मरावंच लागतं । दु:खात अर्जुना ॥२७३॥
आणि जे मरती त्या तमी । मिळते तयांना नरकभूमी । देती वेद ती हमी । याची अर्जुना ॥२७४॥
ऐसे त्या ब्रह्मापासून । कैसे प्रकटती ते त्रिगुण । सांगितले तुला समजावून । अर्जुना मी ॥२७५॥
त्या मूळ ब्रह्माच्या स्वरूपात । फरक काहीच नाही होत । पण कार्यकारण भावात । भासती गुण ॥२७६॥
जसे आपण त्या स्वप्नात । सर्वकाही असतो होत । स्वप्नी सुख-दु:ख जसं भासतं । तैसे अर्जुना ॥२७७॥
तैसे उत्तम मध्यम अधम । ते मूळचेच बा ब्रह्म । गुण आकाराकारणे भ्रम । भासतो अर्जुना ॥२७८॥
किती वेळा करू कथन । येथे काहीच नसे ब्रह्मावाचून । पुन्हा तयाचे ते निरूपण । ऐक अर्जुना ॥२७९॥
अहंकाराच्या कारण । प्रकटता बा त्रिगुण । आणि देहाच्या निमित्तानं । खेळ त्यांचा ॥२८०॥
जसे इंधनाच्या कारण । घडे अग्नीचे ज्वलन । वा त्या भूमीरसाकारण । प्रकटन वृक्षाचे ॥२८१॥
दुधाकारणे दही प्रकटणे । वा गोडी उसाच्या निमित्ताने । तैसे त्रिगुणाचे होणे । जाण तू अर्जुना ॥२८२॥
अर्जुना हेच बा त्रिगुण । प्रकटती देह म्हणून । जे बंधनासी कारण । असे अर्जुना ॥२८३॥
आश्चर्य आहे धनुर्धरा । असो कितीही त्रिगुणाचा पसारा । परि आत्मतत्त्वाचा गाभारा । स्पर्शातीत ॥२८४॥
आपुलाल्या गुणात । हे त्रिगुण असती फिरत । पण काहीच उणेपण नाही येत । त्या आत्मतत्त्वा ॥२८५॥
ऐसा सहज मुक्तीचा प्रकार । आता मी सांगणार । ज्ञानकमळावरील भ्रमर । अर्जुना तू ॥२८६॥
असूनही त्या गुणात । तत्त्व गुणासारखं नाही होत । हे सांगितलं बा तेराव्यात । अर्जुना तुला ॥२८७॥
स्वप्नातून जाग येता । भास संपती ते सर्वथा । तैसा आत्मबोध होता । मिथ्याच सारे ॥२८८॥
जसे नदीकाठी उभे राहून । प्रतिबिंब हालताना पाहणं ।भास जो तरंगाच्या कारण । तैसे अर्जुना ॥२८९॥
पहा त्या नाटकात । काहीच सत्य नसतं । आणि नट असती जे जाणत । तैसे अर्जुना ॥२९०॥
जसं त्या आकाशानं । तिन्ही ऋतू धारण करणं । परि तयाचे ते अलिप्तपण । नच भंगे कधी ॥२९१॥
राहूनही त्या त्रिगुणात । जे असे बा अलिप्त । ऐसे स्वयंभू ते तत्त्व । ब्रह्म अर्जुना ॥२९२॥
ते तत्त्व असे जाणत । स्वत:स केवळ साक्षीभूत । आणि भासते जी क्रियाजात । ते कार्यकारण ॥२९३॥
सत्त्व रज तमा कारण । प्रकटती ही भिन्न लक्षणं । मग कर्माचं रहाटणं । चाले येथे ॥२९४॥
निसर्गाचं ते फुलणं । जसे वसंताच्या कारण । तैसेच माझं असणं । या गुणामाजी ॥२९५॥
नक्षत्रांचं ते लोपणं । सूर्यकांत मण्यानं चमकणं । कमळानं ते उमलणं । नि अंधाराचं संपणं ॥२९६॥
हे सर्व जे घडणं । ते सूर्योदयाचेच कारण । तरी सूर्याचे अकर्तेपण । नच भंगे कधी ॥२९७॥
मीच गुण होऊन प्रकटतो । नि तयांना ते पोसतो । आणि मीच शेवटी उरतो । नष्ट होता गुण ॥२९८॥
विवेक तो जागता । प्रकटते ती गुणातीतता । गुण आकार संपता । मीच उरे ॥२९९॥
ऐसे गुणापलीकडे जाता । उरते निर्गुण तत्त्वत: । आत्मज्ञान ते होता । मोक्ष अर्जुना ॥३००॥
नदी जशी समुद्रात । एकरूप असे होत । तसा ज्ञानी असे सामावत । माझ्यात अर्जुना ॥३०१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसं त्या नलिकेपासून । पोपटाने सुटून जाणं । तैसे जीवभाव संपून । तो ब्रह्म होई ॥३०२॥
जो अज्ञानरूपी झोपेत । जोरात होता घोरत । तो आत्मस्वरूपा पावत । मुक्त होई ॥३०३॥
जीवभावाच्याच कारण । भासत होते ते द्वैतपण । आता त्या द्वैताभावातून । सुटून जाई ॥३०४॥
अहंकार वादळ संपता । लाटा सागर एकरूपता । तैसी जीवा शिवाची एकता । अनुभवा येई ॥३०५॥
होता पावसाळ्याचा अंत । मेघ आकाशी विरतात । तैसे जीव ब्रह्मतत्त्वात । लय पावी ॥३०६॥
ऐसे ब्रह्म ते अनुभवत । देहात जरी राहिला मरेपर्यंत । तरी तो या त्रिगुणात । अडकत नाही ॥३०७॥
जसा त्या काचेत । प्रकाश नाही अडवला जात । आणि समुद्राग्नी नसे विझत । पाण्याने कधी ॥३०८॥
तैसे आत्मबोध होऊन । गुणांकारणे मलिन न होणं । जसे पाण्यातल्या प्रतिबिंबापासून । अलिप्त बा चंद्र ॥३०९॥
अर्जुना त्या तिन्ही गुणानं । देहास बा नाचवणं । पण तो ब्रह्मभावातून । नच चळे कधी ॥३१०॥
ऐसे आत्मज्ञान होऊन । तयाने स्वरूपात स्थिर होणं । मग शरीराचेही भान । उरेच ना ॥३११॥
जसे सापाने कात टाकता । नि खोल बिळांत जाता । मग कातेची ती चिंता । सापास नाही ॥३१२॥
जेव्हा कमळ ते सुकतं । नि सुगंध विरे आकाशात । मग सुगंध परत कमळात । परतत नाही ॥३१३॥
तैसे ब्रह्ममय होणे । जे देहमनाचे विसरणे । मग गुणांचे हे खेळणे । थांबून जाई ॥३१४॥
म्हणून जन्म जरा मरण । जे देहाचे सहा गुण । ते जाती बा विरून । ज्ञान होता ॥३१५॥
जसे घट जाता फुटून । घटाकाश महदाकाश होणं । तैसे जिवाने ब्रह्म होणं । आहे अर्जुना ॥३१६॥
तैसे जीवबुद्धि संपून । आत्मतत्त्वी एकरूप होणं । मग आत्मस्वरूपावाचून । न आठवे काही ॥३१७॥
ऐसा होऊन आत्मबोध युक्त । असे देही तो वावरत । तया म्हणून गुणातीत । म्हणतो आम्ही ॥३१८॥
या देवाचिया बोला । अर्जुन अति सुखावला । जसा मोराने आमंत्रिला । अर्जुना मेघ ॥३१९॥

अर्जुन उवाच

मग संतोष तो पावून । विचारता झाला अर्जुन । सांगावी देवा लक्षणं । ज्ञान्याची आता ॥३२०॥
तो निर्गुणात कसा वावरतो । नि गुणातून कसा सुटतो । कर सविस्तर खुलासा तो । भगवंता आता ॥३२१॥
अर्जुनाचा प्रश्न ऐकून । मग म्हटलं भगवंतानं । तुझ्या शंकेचे निरसन । ऐक आता ॥३२२॥
पहा पार्था तुझी नवलाई । तू भलतेच विचारले काही । शब्द गुणातीत पाही । लटिकाच ॥३२३॥
असता अर्जुना आचार । तो गुणातीत कैसा खरोखर । म्हणून गुणातीत शब्द वापर । लटिकाच की ॥३२४॥
त्रिगुणी शरीरात राहून । त्या त्रिगुणात न सापडणं । अशक्यच हे घडणं । वाटे तुजला ॥३२५॥
जी शंका तुझ्या मनात । तेच आता मी असे सांगत । मन ते एकाग्र करत । ऐकावे आता ॥३२६॥
वाढता रजोगुण चित्ती । कर्माचे अंकुर उगवती । नि लोभाची ती प्रवृत्ती । वाढते मग ॥३२७॥
पण मीच कर्म असे करत । असा गर्व नाही उरत । तया वाईट नाही वाटत । अपयश येता ॥३२८॥
अथवा वाढ सत्त्वगुणाची होऊन । ज्ञानतेज सर्वत्र पसरणं । तरी मनी ज्ञान अभिमान । आढळेच ना ॥३२९॥
अथवा वाढता तो तमोगुण । तयाने मोहा बळी न पडणं । कोणत्याही त्या कारणानं । नच भ्रमे तो ॥३३०॥
करण्या ज्ञानाचा प्रसार । नाहीच बा तो तत्पर । सत्त्वाची होता हार । न दु:ख तयासी ॥३३१॥
सकाळ दुपार रात्रीचं भान । जसे सूर्याला नसणं । तसे कोणतेही कारण । नच हालवे तया ॥३३२॥
भरती येण्या सागरास । जसा न लागे पाऊस । गरज तशी ज्ञान्यास । नसेच कशाची ॥३३३॥
कर्म जरी केले । ते अंगी कधी न चिकटले । कधी हिमालया का भरले । हीव अर्जुना ॥३३४॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मोहाच्याही प्रसंगात । ज्ञानच असे तळपत । असे का उन्हाळा जाळत । विस्तवा कधी ॥३३५॥
अवघेचि सारे विश्व हे । जाणे स्वत:च आपण आहे । म्हणून कोणाही संगे नोहे । आसक्ती द्वेष ॥३३६॥
घेऊन आत्मतत्त्वाची प्रचीती । तो देहा आलासे वस्ती । जैसे वाटसरू रहाती । धर्मशाळेत ॥३३७॥
जसं त्या युद्धभूमीनं । हारण्या जिंकण्यात भाग न घेणं । तसं कोणत्याही लाभहानीनं । नच हाले तो ॥३३८॥
शरीरा आतील प्राण । वा अतिथी जो ब्राह्मण । असती जैसे उदासीन । सर्वाठायी ॥३३९॥
गुणांच्या त्या गोंधळाने । ज्ञान्याने न डळमळणे । जसे मेरू स्थिर असणे । मृगजळाठायी ॥३४०॥
बहुत काय ते बोलणे । आकाश का हाले वाऱ्याने । वा गिळले का अंधाराने । सूर्यासी कधी ॥३४१॥
जसे स्वप्नाची ती गत । जागता अर्थ नसे उरत । तसे ज्ञानी न बांधले जात । गुणांनी अर्जुना ॥३४२॥
गुणांमुळे नसे तो फसत । तटस्थपणे असे अनुभवत । जसे प्रेक्षक असती पहात । खेळ बाहुल्यांचा ॥३४३॥
सत्त्वाकारणे सात्त्विकता । रजाकारणे कर्मठता । तमाकारणे अज्ञानता । जाणे तो अंतरी ॥३४४॥
गुणांचे हे वावरणे । त्या आत्मतत्त्वाच्याच कारणे । पहाणे जसे विश्वासी तटस्थपणे । सूर्याने अर्जुना ॥३४५॥
जशी समुद्रा येते भरती । सोमकांत ते पाझरती । कमळे ते उमलती । परि चंद्र उगा ॥३४६॥
थांबणे की वाहणे वाऱ्याने । तरी आकाश निश्चल असणे । तसा ज्ञानी गुणाकारणे । डगमगे ना ॥३४७॥
ऐसा त्या लक्षणांनी । युक्त असे तो ज्ञानी । कैसी तयाची करणी । ऐकावी आता ॥३४८॥
जसं त्या वस्त्रात । सुतावाचून अन्य काहीच नसतं । तसा सर्व या विश्वात । मीच अर्जुना ॥३४९॥
जसा वैरी व भक्तात । भगवंत भेद नाही करत । तैसे तो सुखदु:खात । सम अर्जुना ॥३५०॥
जसं त्या माशानं । पाण्यात विहार करणं । तैसा देह करता धारण । सुखदु:ख अर्जुना ॥३५१॥
आत्मतत्त्वा त्या अनुभवता । देहासी तादात्म्य तुटता । मग कोणतीच सुखदु:खता । न हालवी तया ॥३५२॥
जसं बा त्या नदीने । सागरी मिसळून जाणे । मग खळबळीचे थांबणे । अनायासे ॥३५३॥
तैसे आत्मतत्त्व अनुभवता । तादात्म्य जिवासी तुटता । सुखदु:खाची ती वार्ता । नच उरे तेथे ॥३५४॥
रात्र आणि ती प्रभात । खांबासी सारखीच असे वाटत । तैसा द्वंद्वाच्या अतीत । ज्ञानी अर्जुना ॥३५५॥
झोपलेल्या मनुष्याशी । साप तैसी उर्वशी । तैशी त्या आत्मज्ञान्याशी । द्वंद्वे अर्जुना ॥३५६॥
शेण आणि सोनं । गार आणि रत्न । दोन्ही बा समान । ज्ञानीयासी ॥३५७॥
घरी स्वर्गसुख येणे । वा हल्ला वाघाचा होणे । तरी कदापि न ढळणे । याची ब्रह्मस्थिती ॥३५८॥
मेलेले नाही उठत । आणि भाजलेले नाही अंकुरत । तशी समता नसे ढळत । तयाच्या मनी ॥३५९॥
तैसे स्तुती वा निंदेने । याने कदापि न ढळणे । जसे नाही जळणे वा विझणे । राखेच्या ठायी ॥३६०॥
होता निंदा स्तुतीचा वार । ज्ञानी समच राहणार । आढळे का कधी अंधार । सूर्याच्या ठिकाणी ॥३६१॥
ईश्वर म्हणुनी पुजिता । का चोर म्हणुनी दंडिता । वाघानेही वेढिता । सम बुद्धि ॥३६२॥
शत्रू असो वा मित्र । हा समचि सर्वत्र । जशी पहाट आणि रात्र । सूर्या नाही ॥३६३॥
घडो ऋतूंचे येणे जाणे । परि अलिप्त आकाशाने राहणे । तैसी विषमता न जाणे । मन कधी ॥३६४॥
आणिक एक लक्षण । तयाठायी दिसणं । तो कर्मेही ती करून । अलिप्त राही ॥३६५॥
अवधानी कर्मांना भोगून । टाके तो संपवून । अंतरी कर्मबीजे जाळून । खाक करी ॥३६६॥
सर्व त्या अनुभवात । हा समचि असे राहत । ऐसे कर्मबीजे जाळत । शुद्ध होई ॥३६७॥
सुखात आणि दु:खात । मन सम ठेवत । संकल्प विकल्प सोडत । उन्मनी जाई ॥३६८॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे हे सर्वगुण । जयाच्या ठिकाणी दिसणं । अर्जुना तयासीच जाण । गुणातीत तू ॥३६९॥
कोणत्या त्या उपायानं । गुणातीत ते होणं । करावे आता ते श्रवण । अर्जुना तू ॥३७०॥
होता व्यभिचाररहित चित्त । भक्तीयोग असे घडत । मगच होणे गुणातीत । शक्य अर्जुना ॥३७१॥
तरी कोण मी कैसी भक्ती । व्यभिचार कशा म्हणती । ही आघवीच निरुती । होआवी लागे ॥३७२॥
अर्जुना खुलासा करतो याचा । जैसा रत्नप्रभा आणि रत्नाचा । तैसा माझा आणि विश्वाचा । संबंध आहे ॥३७३॥
द्रवपणचि ते नीर । अवकाशचि अंबर । जसे गोडी आणि साखर । भिन्न नाही ॥३७४॥
वन्ही तेचि ज्वाळ । पाकळ्या तेचि कमळ । वृक्ष तेचि डहाळ । फलादिक ॥३७५॥
हिम जे गोठले । तेचि हिमालय झाले । आणि दूध जे मुरले । तेचि दही ॥३७६॥
तैसे विश्व ज्याचे नाव । ते मीचि बा सर्व । विश्वाची ती जाणीव । माझे ठायी ॥३७७॥
तुपाचे जे थिजलेपण । ते तूपचि जाण । का न आटिता कंकण । सोने जेवि ॥३७८॥
न उकलता पट । तंतूचि असे स्पष्ट । न विरता तो घट । माती जेवि ॥३७९॥
हे जे विश्वपण । अर्जुना ते मीचि जाण । माझ्याहून भिन्न । विश्व नाही ॥३८०॥
मज जाणणे अभिन्नपणे । तेचि मी भक्ती म्हणे । मजसी द्वैती पाहणे । व्यभिचार ॥३८१॥
सर्व द्वैत ते सोडून । मजसी एकरूप होऊन । स्वत:ला ते जाणून । जाणावे मला ॥३८२॥
सोन्याच्या त्या टिकली ठायी । सोन्यावीण दुजे नाही । तैसे नाही माझ्या तुझ्याठायी । ब्रह्मावीण काही ॥३८३॥
सूर्य आणि किरण । तैसे ब्रह्म आणि मीपण । विरता ते अहंपण । ब्रह्म होई ॥३८४॥
पै परमाणु भूतळी । हिमकणु हिमचळी । अहंमाजी न्याहाळी । मला तैसे ॥३८५॥
तरंग असो ना का लहान । पण सागरासी नाही भिन्न । तैसे ईश्वर आणि मीपण । अभिन्नच की ॥३८६॥
ऐसे मज समरस होणे । तेचि मजसी जाणणे । तयासीच भक्ती म्हणे । अर्जुना मी ॥३८७॥
ज्याला म्हणतात ज्ञान । तेचि भक्तीचे अंगण । योगाचेही पटांगण । तेचि असे ॥३८८॥
थेंब आणि सागर । तैसे मी आणि चराचर । अवघाच व्यवहार । माझे ठायी ॥३८९॥
विहीर आणि आकाशा । सांधा नाही अर्जुना जैसा । मीपण नि परमात्मा तैसा । आहे ऐक ॥३९०॥
प्रतिबिंब बिंबाचे कारण । सूर्याकारणे सूर्यकिरण । तैसे ब्रह्म आणि मीपण । अभिन्नच की ॥३९१॥
ऐसे मजसी जाणून । विरते ते ब्रह्मपण । घडे ब्रह्मभावाचं विरणं । शून्याठायी ॥३९२॥
जसा मिठाचा तो कण । जाई सागरी विरून । तैसेच अर्जुना जाण । घडे सारे ॥३९३॥
जैसे गवत जाता जळून । अग्नी जातसे विझून । तैसे अज्ञान संपून । ज्ञान ही नुरे ॥३९४॥
मग संपता ईश्वरपण । नच उरे भक्तपण । जे ऐक्य आहे जाण । अनादि अर्जुना ॥३९५॥
ऐसे ऐक्य ते घडता । प्रकटते गुणातीतता । मग गुणांची ती वार्ता । उरत नाही ॥३९६॥
ऐसी दशा ती पावणं । तेचि ब्रह्ममय होणं । अर्जुना तयासीच भजन । म्हणतो आम्ही ॥३९७॥
ऐसे हे ज्ञान । अंतरी बा जाणणं । तेच ब्रह्ममय होणं । असे अर्जुना ॥३९८॥
जसे त्या गंगेने । सागरी एकरूप होणे । तैसे ब्रह्मासी पावणे । आहे अर्जुना ॥३९९॥
ऐसे प्रकटणे ज्ञान । तेचि माझी सेवा घडणं । मजसी एकरूप होणं । भक्ती आहे ॥४००॥
ऐसी ही ब्रह्ममयता । जिचे नाव सायुज्यता । जो पुरुषार्थ चौथा । आहे अर्जुना ॥४०१॥
ब्रह्ममय होणे । तेचि मजसी आराधणे । नाही कोणत्याही साधनाने । प्राप्ती माझी ॥४०२॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐशा या ज्ञाना । प्राप्त होता अर्जुना । जीवभावाची विवंचना । सरून जाई ॥४०३॥
जया ब्रह्म बा म्हणतात । तो मीचि असे असत । आत्मा चैतन्य म्हणतात । अन्य काही ॥४०४॥
चंद्रप्रकाश नि चंद्रमा । दोन नसतीच सुवर्मा । तैसे मज आणि ब्रह्मा । भेद नाही ॥४०५॥
अगा नित्य जे निष्कंप । अनावृत्त धर्मरूप । अनंत नि अमाप । ब्रह्म अर्जुना ॥४०६॥
विवेकाच्या कारण । सर्व कामना सोडून । ब्रह्ममय होणं । ज्ञान आहे ॥४०७॥
ऐसे हे विवेचन । केले पहा भगवंतानं । आणि तो अर्जुना । ऐकत होता ॥४०८॥
तेव्हा तेथे संजयाला । धृतराष्ट्र बा म्हणितला । तुझ्या या ज्ञानाला । मी पुसले काई ॥४०९॥
दूर कर माझी चिंता । सांग विजयाची वार्ता । बंद कर बाता । ब्रह्ममयतेच्या ॥४१०॥
नवल वाटून संजयाला । स्वत:शीच उद्‌गारला । भगवंताशी पहा याला । द्वेष आहे ॥४११॥
कृपा देवाची होवो । अज्ञान याचे जावो । मोहाचा तो होवो । अंत याच्या ॥४१२॥
ऐसे ऐकून ते ज्ञान । संजय गेला आनंदून । ज्ञान ते विलक्षण । अंतरी झाले ॥४१३॥
म्हणून तुम्ही सावधपणे । मन स्थापून अवधाने । भगवंताची वचने । ऐका आता ॥४१४॥
त्या शब्दांचा भावार्थ । प्रकटो तुमच्या चित्तात । तुम्हा असे बा विनवत । ज्ञानदेव ॥४१५॥

ॐतत्सदिति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगोनाम चतुर्दशोऽध्याय: ॥१४॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०